# ‘राफेल’ प्रकरणातील निकालाची परीक्षा

*प्रस्थापित सरकारकडून मुभा मिळेल तितपतच न्यायिक कृतिशीलता सर्वोच्च न्यायालय दाखवतं.*

राफेल करारासंबंधी तपास गट स्थापन करण्यास नकार देणारा निवाडा सर्वोच्च न्यायालयाने दिला. या प्रकरणात न्यायालयाने घाईगडबडीने अपूर्ण कृती केल्याचं दिसतं. काही भाष्यकारांनी या निवाड्यातील अनेक तथ्यांसंबंधीच्या त्रुटी आधीच दाखवून दिल्या आहेत. भारताच्या महाअभिलेखापालांनी (कॅग : कंट्रोलर अँड ऑडिटर जनरल) संसदेच्या लोकलेखा समितीला आधीच यासंबंधीचा अहवाल सादर केला होता, हा न्यायालयाचा समजच मुळात निराधार होता, ही या निवाड्यातील एक लक्षणीय त्रुटी आहे. या उघड त्रुटीने सार्वजनिक अवकाशात रास्त लक्ष वेधून घेतलं आहे, पण त्याचसोबत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल अनेक शंकास्पद गृहितकांवर आधारलेला आहे आणि कायदेशीर विश्लेषणाला त्यात फाटा देण्यात आला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ज्या बनावट पद्धतीने या प्रकरणाची सुनावणी घेतली, त्यामुळे या त्रुटी आणखी गंभीर बनतात. आरंभिक याचिकाकर्त्यांनी अतिशय ठिसूळ व कमजोर याचिका दाखल केल्या होत्या आणि त्या फेटाळण्याच्या लायकीच्या होत्या, असं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं होतं. तरीही, अधिक माहितीपूर्ण व तपशीलवार हस्तक्षेप होईपर्यंत हे प्रकरण जिवंत ठेवण्याचं काम न्यायालयाने केलं. या पार्श्वभूमीवर होणाऱ्या सुनावणीदरम्यान मात्र या प्रश्नाचा अधिक तपास गरजेचा आहे, हे न्यायालयाला पूर्णतः मान्य झाल्याचं कधीच जाणवलं नाही.

सुनावणी दरम्यानच्या घडामोडीही न्यायालयाच्या अपुरेपणाला अधोरेखित करणाऱ्या होत्या. एक, या प्रकरणातील दरविषयक बाबींमध्ये आपण लक्ष घालणार नाही, असं न्यायालयाने सांगितलं. पण नंतर विचार बदलून न्यायालयाने सरकारला या करारातील दरविषयक तपशील ‘बंदिस्त लिफाफ्या’तून सादर करण्याचे आदेश दिले. दोन, दरविषयक तपशील केवळ अशा ‘बंदिस्त लिफाफ्या’तून सादर करण्यासोबतच केंद्र सरकारचा बराचसा युक्तिवादही अशाच बंदिस्त लिफाफ्यातील कागदपत्रांमधून करण्याची परवानगी न्यायालयाने दिली असावी, असं दिसतं. पर्यायाने, याचिकाकर्त्यांना सरकारी पक्षाच्या मुद्द्यांचं खंडन करण्याची संधी मिळाली नाही. कॅगचा अहवाल आणि लोकलेखा समिती यांच्या संदर्भातील त्रुटीचा स्रोत हाच असावा, हे स्पष्ट आहे. केंद्र सरकारनं जाणीवपूर्वक न्यायालयाची दिशाभूल केली की न्यायालयानेच या परिच्छेदाचा चुकीचा अर्थ लावला, हे अजून स्पष्ट झालेलं नाही. याचं उत्तर काहीही असलं तरी न्यायालयाची कामगिरी खराब झाल्याचंच त्यातून सिद्ध होतं. सरकारने न्यायालयाची दिशाभूल केली असेल, असं मानलं तरी, सरकारच्या प्रतिपादनांची तिसऱ्या पक्षाकडून खातरजमा करून घेणं हे न्यायालयाचं कर्तव्य आहे. केवळ ‘बंदिस्त लिफाफ्या’तून आल्यामुळे त्या युक्तिवादावर न्यायालयाने विश्वास ठेवता कामा नये.

तीन, संरक्षणसामग्रीच्या खरेदीचे प्रश्न आपल्या तांत्रिक क्षमतेच्या पलीकडचे आहेत, यावर सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी भर दिला, पण भारतीय हवाई दलासाठी देसॉल्ट राफेल लढाऊ विमानं गरजेची होती, असा ओझरता शेरा मात्र न्यायालयीन निकालपत्रात

मारलेला आहे. सुनावणीवेळी हवाई दलाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या अस्ताव्यस्त स्वरूपाच्या 'संवादां'वर हा शेरा आधारलेला असावा. या संबंधीची निवेदनं शपथेवर करण्यात आलेली नाहीत किंवा कोणत्याही अधिकृत स्वरूपात त्यांची नोंद झालेली नाही; अशावेळी सुनावणी न्यायालयातही या निवेदनांना तातडीने रद्दबातल करण्यात आलं असतं. पण सर्वोच्च न्यायालयाने आत्मविश्वासाने या निवेदनांमधून अवतरणं आधाराला घेत राफेल करारातील तपासाची शक्यता फेटाळली.

अखेरीस कोणताही वाद निर्माण होणार नाही अथवा सत्य सार्वजनिक अवकाशात येणार नाही, अशी तजवीज करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने या करारासंबंधीच्या बहुतांश प्रश्नांना बंदिस्त लिफाफ्यातच ठेवलं आहे आणि अशा वादांच्या बाबतीत निवाडा करण्याच्या स्वतःच्या क्षमतेबद्दल मात्र अनेक प्रश्नांना जागा करून दिली.

संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या अखेरच्या काळात समोर आलेल्या घोटाळ्यांच्या तपासाबाबत सर्वोच्च न्यायालयाने अतिशय उत्साह दाखवला होता, पण आता नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारला निश्चलनीकरणापासून ते न्यायाधीश ब्रिजगोपाल हरकिशन लोया यांच्या शंकास्पद मृत्यूपर्यंत विविध वादग्रस्त प्रकरणांमध्ये धारेवर धरण्याबाबत सर्वोच्च न्यायालय अनुत्सुक असल्याचं चित्र आहे, असं सामान्य निरीक्षकांना जाणवतं. प्रस्थापित सरकार मुभा देईल तितकीच न्यायिक कृतिशीलता सर्वोच्च न्यायालय दाखवतं, असा स्पष्ट निष्कर्ष यातून काढता येईल.

पण अशा निष्कर्षांमुळे काही अधिक सखोल सत्यं झाकोळली जातात. सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या काही हस्तक्षेपांना कॅगच्या मसुदा अहवालांचा आधार होता, पण अलीकडच्या काळात या कार्यालयाचा वावरच ऐकिवात येत नाही किंवा त्यासंबंधी काही दृष्टीसही पडत नाही. तपासाच्या अंमलबजावणीसाठी न्यायालय केंद्रीय अन्वेषण विभागावर (सीबीआय : सेन्ट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन) अवलंबून असतं. पण सरकारचा अवाजवी हस्तक्षेप आणि अंतर्गत वादावादी यांमुळे सीबीआय सध्या संपूर्ण गोंधळाच्या अवस्थेत आहे. सीबीआयवर देखरेख ठेवण्याचं काम ज्या संस्थेकडून अभिप्रेत असतं तो केंद्रीय दक्षता आयोग वेळ निघून जाईपर्यंत निष्क्रिय बसून राहतो. कायद्याला अभिप्रेत आहे त्याप्रमाणे कोणतीच संस्था काम करत नसल्यामुळे राफेल कराराविषयी सर्वोच्च न्यायालयाने केलेला कोणताही हस्तक्षेप म्हणजे अंधारात हात मारण्यासारखा प्रकार ठरला असता.

या करारामागे काही कुटील हेतू असेल, ही शक्यताही या निकालात नजरेआड करण्यात आली आहे, हा एक कुतूहलजनक भाग आहे. सरकारने दिलेल्या माहितीच्या आधारावर निकाल द्यायची घाई न्यायालयाला झाली होती, असं दिसतं. संपूर्ण निकालासाठी आवश्यक असलेली संपूर्ण माहिती देण्याची जबाबदारी सरकारवर होती, परंतु तसं काही घडलेलं दिसत नाही. अशा परिस्थितीत, न्यायालयाने आवश्यक माहितीची मागणी करायला हवी होती. या खटल्यात अधिक परिपूर्ण निकाल यायचा आहे, असं वाटण्यासारखी ही अवस्था आहे.

सदर संस्थांनी सहकार्य केलं असतं, तरीही न्यायालयीन हस्तक्षेपाद्वारे न्यायाचा उद्देश वा व्यापक घटनात्मक उद्दिष्टं साध्य होतातच याची कोणतीही खात्री देता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाने कितीही पवित्रा घेतला तरी, टू-जी स्पेक्ट्रम वाटप प्रकरणातील सर्व आरोपींना सुनावणी न्यायालयाने निर्दोष मुक्त केल्यामुळे त्या खटल्याचा शेवट निराशाजनकच झाला. या प्रकरणाशी संबंधित कोणत्याही संस्थेने स्वतःच्या चुकीची अंशतः कबुलीही दिलेली नाही.

राफेल करारासारख्या प्रकरणांमध्ये उचित प्रक्रिया पार पाडणारी आणि समतोल मूल्यमापन करणारी भूमिका

सर्वोच्च न्यायालयाला कधीतरी बजावावी लागेलच. कायदेशीर वादांमधील तटस्थ मध्यस्थ, ही सर्वोच्च न्यायालयाची भूमिका आहे का? की, सत्य शोधण्याचं कार्य पार पाडणारी चौकशी संस्था, हे सर्वोच्च न्यायालयाचं स्थान आहे? आपल्या सोयीने न्यायालयाने यातील एक भूमिका निवडणं योग्य आहे का? सध्या न्यायालयीन भूमिकेविषयी सुरू असलेली चर्चा पाहता अशा आत्मनिरीक्षणापासून सर्वोच्च न्यायालयाला पळ काढता येणार नाही.

●

## भाजपच्या आत्मविश्वासात घट

*निवडणुकीच्या निकालांमुळे लोक पुन्हा एकदा राजकीय आस्थेच्या केंद्रस्थानी येतात.*

छत्तीसगढ, मध्यप्रदेश व राजस्थान या राज्यांमधील भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) नेतृत्वाखालील सरकारांना लोकांनी स्पष्टपणे नाकारलं. केंद्र सरकारच्या लोकविरोधी धोरणांमुळे निर्माण झालेली नाराजीही विधानसभांच्या या निकालांमधून प्रतिबिंबित झाली. निवडणुकींमधील हे विपरित परिणाम राज्यस्तरीय घटकांमुळे झाल्याचा दावा भाजपचे समर्थक करत असले, तरी राष्ट्रीय राजकारणातही त्याचे स्पष्ट पडसाद उमटणार आहेत. शेती क्षेत्रातील संकट, बेरोजगारी आणि उपजीविकेच्या संधींचा अभाव, अशा निवडणुकीवर प्रभाव असणाऱ्या प्रश्नांमुळे हे घडलं. पण केंद्र सरकारने राबवलेल्या निश्चलनीकरण, वस्तू व सेवा कर (जीएसटी : गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स) अशा त्रुटीयुक्त धोरणांमुळे आणि शेतीकडे केलेल्या धडधडीत दुर्लक्षामुळे या समस्यांना खतपाणी मिळालं. उपरोल्लेखित राज्यांमधील भाजप सरकारांनी शासनाच्या पातळीवर सातत्याने बेजबाबदारी दाखवलीच, आणि त्यात केंद्र सरकारच्या वर्तनाने भर टाकली. या असंतोषाची जाणीव झाल्यानंतर, आणि जनतेला दिलासा देण्यात आपण अकार्यक्षम ठरल्याचं लक्षात आल्यावर भाजप व संघ परिवार यांनी नेहमीचा द्वेषाचा व धृवीकरणाचा कार्यक्रम राबवायला सुरुवात केली. अधम पातळीवर जाऊन फूट पाडणारी वक्तव्यं करण्यात योगी आदित्यनाथ यांनी आघाडी घेतली. पण या क्लृप्त्यांचा लोकांवर फारसा प्रभाव पडला नाही आणि त्यांनी एकच उद्देश समोर ठेवून मतदान केलं. आदित्यनाथ यांच्या सभा झालेल्या मतदारसंघांमध्ये भाजपची कामगिरी जास्त खराब झाल्याचं दिसतं. राजस्थानातील अलवार प्रांतामध्ये गेल्या चार वर्षांत गोरक्षकांचे जमाव मोकाट सुटले होते, तिथे भाजपचा सपशेल पराभव झाला. तेलंगणातही आदित्यनाथ यांनी निलाजरेपणाने जमातवादी प्रचार केला होता; तिथे भाजपला मोठ्या प्रमाणात जागा गमवाव्या लागल्या. नरेंद्र मोदींनी केलेल्या हिणकस वक्तव्यांनाही मतदारांनी प्रतिसाद दिला नाही. लोकांमधील निराशा वाढते आहे, याचं हे ठोस चिन्ह म्हणावं लागेल.

जाणीवपूर्वक गोंधळ निर्माण करण्याचा नेहमीचा डावपेच लढवत संघ परिवार व भाजप यांनी मध्य प्रदेश व राजस्थान इथे अटीतटीचा सामना झाल्यावर अधिक भर देत पराभवाची वस्तुस्थिती धुसर करायचा प्रयत्न केला. परंतु, मतांच्या टक्केवारीचा विचार केला तर मध्य प्रदेशातील ही निवडणूक आधीच्या निवडणुकांइतकीच अटीतटीची राहिली आणि राजस्थानात काँग्रेस व भाजप यांच्यातील मतांच्या टक्केवारीमध्ये आधीच्या निवडणुकीच्या तुलनेत पडलेले मोठे अंतर पाहता, भाजपसाठी हा मोठाच पराभव आहे, याकडे निर्देश करण्यात आलेला आहे. ही सर्व वरवरची लटकी स्पष्टीकरणं आणि प्रस्थापित सरकारविरोधी मतप्रवाहाचं वाजवलेलं खास तुणतुणं, हे सगळं लक्षात घेतलं तरीही, मध्य प्रदेश व छत्तीसगमध्ये

१५ वर्षं भाजपनं स्वतःकडे ठेवलेली सत्तेची दोरी काँग्रेसने खेचून घेतली आणि राजस्थानात मोठी दरी भरून काढली, ही वस्तुस्थिती उरतेच. काँग्रेसचं सरकार, अगदी एका जागेच्या बहुमताने आलं तरीही, भाजपसमोर त्याचं कणखर आव्हान असणार आहे. २०१४ साली या प्रदेशांतील ६५पैकी ६२ लोकसभा मतदारसंघांमध्ये भाजपला विजय मिळाला होता, पण ताज्या निकालांनंतर भाजपच्या दृष्टीने या जागांवरील निवडणुकीय बळाचा समतोल बिघडला आहे. शहरी मतदारसंघांमध्येही भाजपला मोठा फटका बसला. किंबहुना, ग्रामीण भागांपेक्षा शहरी मतदारसंघांमध्ये भाजपला जास्त विपरित निकालाला सामोरं जावं लागलं आहे. बेरोजगारीमुळे निर्माण झालेला रोष आणि जीएसटीचा लहान व्यवसायांवर झालेला विपरित परिणाम, याचे हे स्पष्ट पडसाद आहेत. शहरी भारतामध्ये मोदी व भाजप यांचा वरचष्मा आहे, असं मानलं जात होतं; पण या निवडणुकांनी या धारणेलाही धक्का दिला.

परंतु, निराशा व जनक्षोभाची व्याप्ती बघता काँग्रेस पक्षाला अधिक मतांनी विजय मिळवता यायला हवा होता. केवळ छत्तीसगढमध्ये काँग्रेसने दोन तृतीयांशांच्या बहुमताने भाजपचा धडधडीत पराभव केला. शिवराजसिंग चौहान यांच्या लोकप्रियतेविषयी उभी करण्यात आलेली बनावट स्पष्टीकरणं आणि मोदींनी शेवटच्या घडीला राजस्थानात केलेला वाढीव दौरा यांमुळे काँग्रेसची गती मंदावली, असं म्हणणं अर्धवटपणाचं ठरेल. संघटनात्मक कमकुवतपणा आणि जनतेच्या जगण्याच्या व उपजीविकेच्या प्रश्नांवर सातत्याने लक्ष केंद्रित ठेवण्यातील अकार्यक्षमता, यांमुळे काँग्रेसच्या यशामध्ये ही उणीव राहिली. छत्तीसगढमध्ये लोकांसमोरील विवंचनेचा मुद्दा पक्षाच्या प्रचारात मध्यवर्ती होता, हे लक्षात घेऊन तिथल्या यशातून काँग्रेस काही धडे घेईल, असं अपेक्षित आहे. राजस्थान व मध्य प्रदेश इथे डाव्या संघटनांच्या आणि लोक चळवळींच्या नेतृत्वाखाली झालेल्या शेतकरी आंदोलनांचा लाभ काँग्रेसला झाला, कारण द्विधृवीय स्पर्धेत तोच एक पर्याय उरला होता.

मध्य प्रदेश व राजस्थानातील मतांच्या टक्केवारीचं विभाजन पाहिलं तर भाजपला सावरायची संधी आहे, त्यामुळे काँग्रेसला केवळ दुसरा उपलब्ध पर्याय राहून चालणार नाही. लोकांच्या जीवनमानात सुधारणा घडवणाऱ्या व सामाजिक स्थैर्याची हमी देणाऱ्या पर्यायी धोरणांचं आश्वासन काँग्रेसने द्यायला हवं. ग्रामीण भागातील संकटाला प्रतिसाद देण्यासोबतच गोरक्षक व संघ परिवाराच्या गुंडांच्या कारवायांवर चाप बसवण्यावरही काँग्रेसने लक्ष केंद्रित करायला हवं. येऊ घातलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघ परिवार व भाजप यांचा विभाजनखोर जमातवादी प्रचार अधिक जोर धरणार आहे, हे लक्षात घेता काँग्रेसला या संदर्भात अधिक गांभीर्याने धोरण ठरवणं अत्यावश्यक आहे. सार्वत्रिक निवडणुकांना आता थोडाच काळ उरला आहे. या कालावधीत तीन राज्यांमधील काँग्रेस सरकारांनी निवडणुकीतील निकालांद्वारे मिळालेला हुरूप टिकवून ठेवण्यासाठी अशा धोरणांची रूपरेखा सादर करायला हवी. जनतेला राजकारणात पुन्हा मध्यवर्ती स्थानी आणणं, ही या निकालांची निष्पत्ती आहे; आणि ही दिशा टिकवून ठेवली तरच विरोधकांना मिळालेली सकारात्मक गती कायम राहील. सार्वजनिक चर्चाविश्वाचा केंद्रबिंदू नेता असू नये, तर धोरणात्मक नीती केंद्रस्थानी असावी. आगामी सार्वत्रिक निवडणुकांमध्ये राजकीय शक्तींमधील परस्परसंबंधांमध्ये निर्णायक बदल होण्यासाठी राजकीय संभाषितामध्येही आवश्यक बदल व्हायला हवा. ●

**परिवर्तनाचा वाटसरूसाठी**
**लेखन पाठवताना**

आपले लेखन पाठवताना संपादनाच्या सोयीसाठी ते सुवाच्य अक्षरात लिहिलेले वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत.
मुद्रित लेख एमएस वर्ड अथवा पेजमेकरमध्ये श्रीदेव ७-०७०८ या अथवा युनिकोड फाँटमध्ये पाठवावे.

# पुतळ्यापलीकडे काय आहे?

*नव–उदारमतवादाच्या राजकारणामुळे राजनैतिक सदिच्छा दुरावते आहे का?*

एका व्यक्तीचा नायक दुसऱ्या व्यक्तीचा खलनायक असू शकतो– हे वाक्य पुतळ्यांच्या राजकारणाविषयी योग्य भाव व्यक्त करणारं आहे. राष्ट्रीय करारीपणाच्या नावाखाली अनेक राजकीय पुतळ्यांची तोडफोड किंवा काढून टाकण्याच्या कृती अलीकडच्या काळात घडल्या, त्यातून याच ओळीची प्रचीती येते. काही अकादमिक/प्राध्यापक यांच्या आवाहनामुळे घाना विद्यापीठाच्या आवारातील मोहनदास करमचंद गांधी यांचा पुतळा हटवण्याची ताजी घटना याला पुष्टी देणारी आहे. भारताच्या राष्ट्रपतींनी २०१६ आफ्रिकेतील तीन राष्ट्रांचा दौरा केला, त्याचं स्मरणचिन्ह म्हणून हा पुतळा उभारण्यात आल्याचं भारत व घाना या देशांच्या सरकारांचं म्हणणं आहे. तर, गांधींचं राजकीय व्यक्तिमत्व 'वंशद्वेष्टच्या' साम्राज्यवादाचाच चेहरा होतं, असं अनेक सर्वसामान्य घानावासीयांना वाटतं. किंबहुना, गेल्या काही काळामध्ये आफ्रिकेतील वसाहतवादविरोधी व वंशद्वेषविरोधी प्रतिमाविध्वंसाच्या अभियानात गांधींचे पुतळे लक्ष्यस्थानी राहिलेले आहेत. दक्षिण आफ्रिकेतील त्यांच्या एका पुतळ्याला २०१५ साली पांढरा रंग फासण्यात आला. भारतीय राष्ट्रपतींच्या अलीकडच्या एका दौऱ्याच्या निमित्ताने मालवीमध्ये गांधींचा पुतळा उभारण्यात येत होता, त्याचं बांधकाम थांबवण्यात आलं. हे पुतळे म्हणजे उभयपक्षी संबंधांचं प्रतीक आहेत असं म्हणणारी सरकारं या सर्व प्रकरणांमधील सार्वजनिक टिकेपासून मात्र अलिप्त अंतर राखून आहेत (खरं तर त्यांची भूमिका जवळपास बेफिकिरीची वाटावी अशी आहे). सरकारांचं मितभाषी राहाणं गांधींविरोधातील वंशद्वेषाच्या आरोपाला वैधता मिळवून देत असेल, तर राजकीय पुतळा–उभारणीचा प्रत्यक्षातील अर्थ काय?

भारत व आफ्रिका या दोन्ही प्रदेशांमध्ये सौम्य–सत्तेसाठी सोयीची व्यूहरचना म्हणून गांधींचं गौरवीकरण (आणि पर्यायाने त्यांच्या पुतळ्यांची प्रतीकात्मक उभारणी) केलं जातं. यामुळे सरकारांना 'राष्ट्र राज्या'चा युक्तिवादही संधिसाधूपणे करता येतो. उदाहरणार्थ, घानामधील सरकारसाठी 'वंशद्वेषा'चा मुद्दा केवळ 'रंगभेदा'पुरता मर्यादित ठेवणं सोयीचं ठरू शकतो. अशावेळी 'वंशकेंद्रित्वा'चा अस्वस्थकारक स्थानिक इतिहास (अकान साम्राज्यामध्ये इतर वांशिक गटांवर लादण्यात आलेली गुलामगिरी) बाजूला सारली जाते. या इतिहासामुळेच विद्यमान काळात अकान/बिगरअकान अशा स्वरूपाची 'जमाती'य विभागणी निवडणुकीच्या काळात घानामध्ये दिसते. शिवाय, राजकीय प्रभाव व संधी यांचं प्रादेशिक एककेंद्रीकरणही झाल्याचं बोललं जातं. परंतु, वांशिक दुर्गम भागांकडून अधिक आर्थिक संधी देणाऱ्या कॉस्मोपॉलिटन भागांकडे (मुख्यत्वे दक्षिणेकडे) वाढत्या प्रमाणात होत असलेलं स्थलांतर वांशिक आघाड्यांचा लाभ उठवणारे राजकीय डावपेच उधळतं आहे. शिवाय, आजच्या सर्वसामान्य घानावासीयाला– मुख्यत्वे २५ ते ३० वर्षं वयोगटातील लोकसंख्येला– या स्थानिक वारश्याची कितपत जाणीव आहे व त्यांच्यावर याचा कितपत प्रभाव पडतो, हेही शंकास्पद आहे. परिणामी, देशाच्या निवडणुकीय लोकशाहीमधील वांशिक/सांस्कृतिक घटकाची निर्णायकता कमकुवत झाली आहे, पण अजून तिचं पूर्ण उच्चाटन झालेलं नाही.

नॅशनल डेमॉक्रेटिक काँग्रेस (एनडीसी) आणि न्यू पॅट्रिऑटिक पार्टी (एनपीपी) या दोन प्रबळ राजकीय पक्षांमधील (धोरणात्मक) सीमारेषा पुसट होत असल्यामुळे ही निर्णायकता अधिक खंगली आहे. या पक्षांनी आपापल्या राजकीय वारश्यामध्ये व विचारसरण्यांमध्ये भेद असल्याचं जाहीर केलं असलं, तरी हे दोनही पक्ष मुख्यत्वे आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांच्या

नव-उदारमतवादी शिफारशींचं अनुकरण करतात. त्यामुळे सकल घरेलू उत्पन्न (जीडीपी : ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट), वृद्धीवर आधारित विकासात्मक संभाषित, आणि या वृद्धीला चालना देण्यासाठी खाजगी आणि/किंवा परकीय गुंतवणूक यांचा पुरस्कार- याच घटकांना अधिकाधिक वैधता दिली जाते. घानामधील अप्रत्यक्ष विभाजनाचं राजकारण प्रश्नांऐवजी व्यक्तिमत्वाला केंद्रस्थानी ठेवणारं राहिलं आहे, त्यामुळे घोषणाबाजी आणि व्यक्ती वा गटांना तत्काळ भौतिक साहाय्याचं आश्वासन देण्यावर त्याचा भर असतो. अशा संदर्भात 'तरुण' मतदारांचा निवडणुकीतील कल हा त्यांच्या (सामाजिक-आर्थिक) आस्थाविषयांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या राजकारण्यांच्या/सरकारच्या राजकीय वा सांस्कृतिक 'परिप्रेक्ष्या'वर मुख्यत्वे अवलंबून असतो. त्यामुळे अनेकदा 'स्कर्ट अँड ब्लाउज' (विस्मित करणारं) मतदान होताना दिसतं (उदाहरणार्थ, एकाच मतदारसंघामधून दोन प्रतिस्पर्धी पक्षांचे राष्ट्राध्यक्षीय व संसदीय उमेदवार निवडले जाण्याची पद्धत).

अशा प्रकारच्या डळमळीत रचनेमुळे निवडणुकीय यशापयशातील राजकीय प्रस्थापितविरोधाची धार बोथट होते. त्याचप्रमाणे अनुग्रहावर आधारित संबंधांना मोकळा अवकाश मिळतो. 'वृद्धी' पुनर्स्थापित करण्यासाठी अर्थव्यवस्थेचं 'व्यवस्थापन' करण्याची क्षमता (किंवा तिचा देखावा उभारण्याची ताकद) सरकारमध्ये किती प्रमाणात आहे त्यावर नागरी भागांतील अभिजनांमधील राज्यसंस्थेची वैधता अवलंबून असते. विशेषतः सध्याच्या काळात जीडीपी खालावतो आहे, महागाई वाढते आहे, ऊर्जेचा तुटवडा जाणवतो आहे आणि तेल क्षेत्रातील महसुलाविषयीचा आशावाद उफाळतो आहे, अशावेळी या नागरी अभिजनांच्या सदर अपेक्षा अधिक तीव्र होतात. ग्रामीण भागांमध्ये, विकासाविषयीच्या ऐतिहासिक प्रादेशिक पक्षपातीपणामुळे परिवर्तनकारी राजकारणाचा दावा पोकळ ठरला आहे. बिगरसरकारी संस्थांच्या पद्धतीचे हस्तक्षेप वाढवावेत, अशी लोकानुनयी मागणी दीर्घ काळ दुर्लक्षित राहिलेल्या उत्तरेकडील प्रदेशांमधून होते आहे. हा प्रस्थापित सरकारची कसोटी पाहणारा काळ आहे. दोन्ही राजकीय पक्ष सर्वसामान्य कार्यकर्त्यांवर मोठ्या प्रमाणात विसंबून आहेत. त्यांचे कार्यकर्ते मुख्यत्वे कमी वेतनधारक मजूर आहेत. हे कार्यकर्तेच तळ पातळीवरील संघटनाबांधणी, प्रचार व पक्षनेत्यांसाठी घोषणाबाजी करतात. मतांच्या व मत मिळवण्यासाठी दिलेल्या सहकार्याच्या बदल्यात आपल्याला नोकऱ्या मिळाव्यात, अशी या कार्यकर्त्यांची अपेक्षा असते.

परंतु, मर्यादित भौतिक स्रोतसामग्री असलेल्या राजकीय व्यवस्थेमध्ये अशी अनुग्रहाची व्यवस्था अतिशय स्फोटक चंचलता धारण करू शकते. घाना सरकारच्या खर्चविषयक अर्थसंकल्पातील अर्ध्याहून अधिक भाग द्विराष्ट्रीय/बहुराष्ट्रीय मदतीवर अवलंबून आहे, आणि सरकारच्या स्वतःच्या महसुलातील जवळपास चार पंचमांश भाग सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च होतो, अशा वेळी कोणतंही सरकार नोकऱ्या कशा निर्माण करेल? अशा प्रकारच्या मर्यादा असलेला घाना हा काही एकमेव आफ्रिकी देश नाही. इतरही अनेक आफ्रिकी देशांच्या बाबतीत वाढता नव-उदारमतवाद आणि जागतिकीकरण यांच्यासोबतच राष्ट्रीय (स्व) करारीपणाच्या नावाखाली लोकशाहीबाबतची तडजोडही केली जाते आहे. सामाजिक उत्तरादायित्वाच्या बाबतीत राज्यसंस्था स्वतःची जबाबदारी टाळते आहे. आफ्रिकेतील सर्वांत सक्षम लोकशाही देशांमध्ये अजूनही घानाचं नाव घेतलं जातं. परंतु, मूक अवशेषांच्या माध्यमातून 'श्रेणिबद्ध' रंगवादाच्या भावनांचा अपहार करून घानाचं सरकार आशियाई/भारतीय निवासींच्या संदर्भातील आपल्या अपयशाची जबाबदारी झटकतं आहे. लोकशाही टिकून राहण्याच्याबाबतीत ही सुचिन्हं नाहीत. या घटनाक्रमातून संस्थात्मक कमकुवतपणा दिसून येतो. शेवटी, आर्थिक एकात्मतेच्या बाबतीत राज्ययंत्रणा दुबळी पडली की लोकशाहीच्या बाबतीत तडजोडी कराव्या लागतात. ●

# स्वत:ला फसवण्याची कला

*मराठा आरक्षण देण्याचा सरकारचा निर्णय प्रामाणिक उद्देशातून आलेला नाही.*

मराठा जातीयांना शिक्षणात व सरकारी नोकऱ्यांमध्ये १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने अलीकडेच जाहीर केला. या निर्णयानंतर संभाव्य लाभार्थींकडून आणि राज्य सरकारकडून दोन गुणात्मकदृष्ट्या भिन्न प्रतिसाद समोर आलेले आहेत. न्यायिक मंजुरी मिळाल्यावरच या निर्णयाची अंमलबजावणी होईल, अशा मांडणीबाबत उघड किंवा छुपी नाराजी व्यक्त करण्याचा संभाव्य लाभार्थींचा उतावीळ प्रयत्न सुरू असल्याचं दिसतं. आपल्या बाजूच्या या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने व्हावी, अशी त्यांची आत्यंतिक इच्छा होती. ही निकड समजून घेता येत असली, तरीही हिंसाचार वा बेकायदेशीर कृतींचा मार्ग पत्करण्यासाठीचं समर्थन म्हणून तिचा वापर होणं योग्य नाही. दुसऱ्या बाजूला या निर्णयाचं व त्याच्या अंमलबजावणीचं श्रेय घेण्यासाठी राज्य सरकार अतिशय उत्साहाने समोर आलं आहे. सरकारने या संदर्भात उचललेल्या पावलांमधून हा उत्साह लखखपणे दिसतो. आरक्षणासंबंधीच्या विधेयकावर महाराष्ट्राच्या राज्यपालांनी अगदी तत्काळ सही केली, त्यापाठोपाठ रोजगारासाठी महाभरती योजनेचा आरंभ झाला आणि मराठा जातीच्या सदस्यांना जातीच्या प्रमाणपत्राचं वाटपही लगोलग सुरू झालं.

आरक्षणाच्या अंमलबजावणीची खातरजमा करण्यासाठी मराठा समुदाय इतक्या तीक्ष्ण दृष्टीने लक्ष का घालतो आहे, हे समजून घेण्यासाठी आत्तापर्यंत महाराष्ट्रात सत्तेवर आलेल्या राज्य सरकारांनी हा विषय कशा रितीने हाताळला हे पाहावं लागतं. भारतीय जनता पक्ष (भाजप) व शिवसेना यांच्या आघाडी सरकारने आरक्षणाचा विषय संदिग्धतेने व अनिर्णायक पद्धतीने हाताळला. मराठा तरुण-तरुणींनी गेल्या तीन वर्षांमध्ये काढलेले मोठमोठे मोर्चे मुळात या संदिग्धतेला व अनिर्णायकतेला दूर करण्यासाठी होते, हे इथे लक्षात घ्यायला हवं. या आंदोलनांच्या प्रक्रियेत मराठा तरुणाईला सामाजिक किंमत मोजावी लागली आहे, त्यामुळे त्यांच्या आताच्या उतावीळपणाला काहीएक नैतिक महत्त्वसुद्धा आहे. त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांतून शेवटी त्यांच्या वैध उद्देशांची पूर्ती झाली, असा विवाद्य मुद्दा काहीजण मांडू शकतात. अशा प्रकारच्या विभागणीला कायदेशीर मान्यतेची गरज नाही, असं प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे सुचवणारे लोक शेवटी सरकारला प्रामाणिक उद्देश राखल्याचं नैतिक प्रमाणपत्र देत असतात. बेरोजगारीच्या गंभीर समस्येपासून सुटका करण्याच्या गरजेसंदर्भात या औदार्याच्या भावनेचं स्पष्टीकरण करता येईल. खरं तर, या गरजेवर प्रामाणिक तोडगा काढण्याचा प्रयत्न करण्याऐवजी सरकारने पोकळ आश्वासनं तेवढी दिली. अशा आश्वासनांचा या सरकारकडे प्रचंड साठा आहे.

परंतु, सरकारच्या उत्साहामध्ये प्रामाणिकपणाचं नैतिक बळ नाही. आरक्षण देण्याच्या निर्णयाभोवतीची कायदेशीर अस्थिरता व संदिग्धता पूर्णतः दूर करणं सरकारला शक्य झालेलं नाही, यावरून ही अप्रामाणिकता दिसते. आरक्षणाच्या निर्णयाला जोरदार गृहपाठाचं पाठबळ पुरवण्यात महाराष्ट्रातील आघाडी सरकार अपयशी ठरलं आहे, असं म्हणता येईल. किंबहुना, या विषयातील त्याचा गृहपाठ अगदीच वाईट अवस्थेत आहे. हा निर्णय इष्ट असला, तरी सरकारने ज्या पद्धतीने हा निर्णय घेतला त्यामध्ये प्रक्रियात्मक कणखरपणाचा अभाव होता. न्यायाचा घटनात्मक आधार टिकवण्यासाठी असा कणखरपणा गरजेचा असतो.

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये सूचित केल्यानुसार, या संपूर्ण प्रश्नाचा तपास करण्यासाठी सरकारने नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल सार्वजनिकरित्या उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे

आरक्षणाची तरतूद कायदेशीर खटल्यांच्या कक्षेपलीकडे जाण्यासाठी आवश्यक तरतूद करण्याची सरकारची इच्छा होती, असं गृहीत धरता येणार नाही. उदाहरणार्थ, निराळ्या शब्दांत सांगायचं तर, मराठ्यांसह कोणत्याही जातीला विविध संधींचा लाभ घेणं अवघड बनण्याला जातीय उतरंडीतील कोणता घटक कारणीभूत ठरतो, हे ठरवणं सदर अहवालाच्या अभावी जटील बनलं आहे. महाराष्ट्राच्या किमान काही भागांमध्ये तरी मराठा जातीयांना अजूनही जुलमी जातीय उतरंडीतील सामाजिक जुलुमाला तोंड द्यावं लागतं, हे दाखवणं शक्य आहे. सामाजिकदृष्ट्या लादलेल्या अनेक अक्षमतांचा अनुभव मराठ्यांनाही घ्यावा लागतो, हा सामाजिक न्यायाचा घटनात्मक आधार बनणं सहज शक्य आहे. परंतु, राज्यघटनेत नमूद केलेलं न्यायाचं व्यापक तत्त्व मात्र आघाडी सरकारच्या निर्णयाला नवसंजीवनी देणारं नाही. किंबहुना, या बाबतीत न्यायाच्या तत्त्वाला स्वतःच्या हीन राजकारणासाठी युक्ती म्हणून वापरण्यात आल्याचं जाणवतं. या संदर्भातील अहवाल उपलब्ध नसल्यामुळे सरकारचा हा निर्णय घाईगडबडीत घेण्यात आल्याचा निष्कर्ष काढावा लागतो.

अर्थात, मराठा तरुणाईमध्ये आपल्याविषयी सकारात्मक भावना राहावी, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सरकार करत आहे. ही सकारात्मक भावना २०१९च्या सार्वत्रिक निवडणुकांपर्यंत टिकून राहावी, अशी सरकारची अपेक्षा असणार.

राखीव जागांच्या मुद्द्याभोवतीचं वास्तव टप्प्याटप्प्याने बदलतं आहे आणि त्यामुळे २०१९ साली सत्ता पुन्हा काबीज करण्याच्या भाजप-शिवसेनेच्या आकांक्षांना मर्यादा येत आहेत. खाजगी क्षेत्रामध्येही आरक्षण असावं, अशी मागणी पुढे आल्यानंतर या मर्यादा अधिकच स्पष्ट झाल्या आहेत. सरकारी क्षेत्रामध्ये पुरेशा नोकऱ्या निर्माण करण्याची क्षमताच राज्यसंस्थेकडे नाही, असं यातून सूचित होतं. किंबहुना, विविध क्षेत्रांमध्ये नोकऱ्यांच्या वाढत्या मागणीचं सततचं सामाजिक आव्हान येत्या काळात प्रत्येक सरकारला पेलावं लागणार आहे. सुरक्षित व प्रतिष्ठित जगण्यासाठीचा संघर्ष केवळ मराठा तरुणाईकडून होत नसून सर्वच तरुण-तरुणींमध्ये अशा जीवनाची आकांक्षा आहे. भारतातील शिक्षित बेरोजगार तरुणाईला ही परिस्थिती कृती करण्यासाठी उद्युक्त करते. आश्वासनं किंवा गैरनियोजन केलेली धोरणं यांद्वारे संघर्षरत तरुणाईवर कायमस्वरूपी नियंत्रण आणणं कोणत्याही सरकारला शक्य होत नाही आणि तरुणाईच्या या संघर्षातूनच नवीन आरंभ होतो. काळाच्या कसोटीवर न टिकणारी धोरणं आखणारं आणि योग्य नियोजन व विचार यांचा अभाव असलेल्या अविश्वासार्ह तरतुदी करणारं सरकार स्वतःचीच फसवणूक करून घेतं आहे. ●

---

## पूर्वग्रहांची बदली

*पोलिसांना जात व जमात यांच्या जाणिवेपलीकडे जाण्यासाठीचं प्रशिक्षण दिलं जातं का?*

दलितांविरोधात आपण कशा खोट्या तक्रारी दाखल करून घेतल्या, मुस्लिमांना कसा त्रास दिला आणि मराठ्यांना कसं संरक्षण पुरवलं, याची बढाई मारणारा भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस : इंडियन पोलीस सर्व्हिस) अधिकारी भाग्यश्री नवटाके यांचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात पसरल्यानंतर महाराष्ट्र सरकारने त्यांची बदली केली. प्रशासक व पोलीस अधिकाऱ्यांची बदली करणं ही एक प्रकारची शिक्षा समजली जाते. पण सरकार व ताकदवान राजकारणी बदलीची यंत्रणा दुहेरी पद्धतीने वापरू शकतात- आपल्या नावडत्या अधिकाऱ्यांना दंड करण्यासाठी किंवा विशिष्ट अधिकाऱ्यांविरोधात कारवाईची मागणी करणाऱ्या

जनतेला सुखवण्यासाठी. नवटाके यांच्या बढाईमध्ये दलित व मुस्लिमांविरोधातील द्वेषपूर्ण पूर्वग्रह भरलेला होता. या घटनेमधून दोन पैलू पुढे येतात : बदली झाल्यामुळे नवटाके यांचा (व्हिडिओत दिसणारा) जातीयवादी व जमातवादी पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन दूर होईल का? प्रशिक्षणाच्या हस्तपुस्तिकांमध्ये काहीही लिहिलं असलं, तरी आजूबाजूच्या समाजाला लागण झालेल्या पूर्वग्रहांपासून व द्वेषापासून प्रशासक व पोलीस अधिकारी अंतर राखू शकतात का?

नोकरशाहीच्या इतर संस्थांप्रमाणे पोलीस दलावरही जात, जमातवाद व पितृसत्ता यांच्या आधारे उभ्या असलेल्या प्रभुत्वशाली विचारसरणीचा पगडा असतो, हे समजून घेण्यात काही अडचण येण्यासारखं नाही. स्त्रिया, आदिवासी, दलित व अल्पसंख्य यांसारख्या समाज-घटकांविरोधात तीव्र पितृसत्ताक व भेदभावजन्य वृत्ती दाखवण्याबाबत पोलीस दल कुख्यात आहे.

सामाजिक-आर्थिक निर्देशांकांनुसार राज्यांची एकूण तुलना केली असता, महाराष्ट्राला 'पुरोगामी' राज्यांमधील एक मानलं जातं. परंतु, वंचित घटकांमधील आरोपींना दिल्या जाणाऱ्या वागणुकीविषयी नवटाके यांनी केलेली दर्पोक्ती राज्याच्या सद्यस्थितीवर अधिक प्रकाश टाकणारी आहे. अगदी नजिकच्या इतिहासात, २००६ साली झालेल्या खैरलांजी हत्याकांडापासून ते दलितांविरोधातील अनेक हिंसाचाराच्या घटनांमध्ये आणि भीमा-कोरेगावमधील दंगलीवेळीही पोलिसांचा या समाजघटकाविषयीचा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन दिसून आला होता. त्यानंतर, 'अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९' (ॲट्रॉसिटी कायदा) हा कायदा रद्द करण्याची मागणी करत मराठा समुदायाने २०१६ साली काढलेल्या मूकमोर्च्यांवेळी दलित समुदायाविरोधातील हिंसाचाराच्या व दंगलीच्या तक्रारींबाबत कारवाई करण्यात पोलिसांनी निष्क्रियता दाखवली, अशा अनेक तक्रारी करण्यात आल्या. मुंबई उच्च न्यायालयात तर यासंबधी एक याचिकाही दाखल झाली. उत्तर प्रदेशात, विशेषतः गेल्या काही वर्षांमध्ये, आरोपींच्या धर्मानुसार पोलीस एक तर आक्रमक होतात किंवा निष्क्रिय राहतात, अशी नकारात्मक ख्याती निर्माण झाली आहे. पोलिसांनी केलेल्या चकमकी ('एन्काउन्टर'; ज्यात खरं म्हणजे थंड रक्ताने नेम धरून हत्या केली जाते); तरुण जोडप्यांना, विशेषतः हिंदू-मुस्लीम जोडप्यांना सार्वजनिकरित्या अपमानित व लज्जित करणारी तथाकथित रोमिओ पथकं, तथाकथित 'लव्ह-जिहाद'विरोधातील विखारी अभियान, आणि कथित गो-तस्करांची सार्वजनिकरित्या जमावाद्वारे होणारी हत्या, या सगळ्या घटनांकडे पाहिलं की उत्तर प्रदेशातील पोलीस दलही समाजात रुजलेल्या पूर्वग्रहांच्या व पक्षपाती वृत्तीसोबत प्रवाहपतित झाल्याचं स्पष्ट होतं. लखनौमध्ये एका कॉर्पोरेट कंपनीच्या निःशस्त्र व्यवस्थापकाला थंड रक्ताने गोळी घालण्यात आली, तेव्हा आरोपी पोलीस कर्मचाऱ्यांविरोधातील कारवाईचा निषेध करत त्यांच्या सहकाऱ्यांनी काळ्या पट्ट्या बांधल्या होत्या. याच राज्यातील हाशिमपुरा खटल्यासंबंधीचा निकाल दिल्ली उच्च न्यायालयाने अलीकडेच दिला. प्रांतिक सशस्त्र पोलीस दलाच्या कर्मचाऱ्यांनी ४२ मुस्लीम पुरुषांचा जाणीवपूर्वक जीव घेतला आणि त्यांची शरीरं कालव्यात फेकून दिली, या हाशिमपुऱ्यातील घटनेबाबतचा हा निकाल ३१ वर्षांनी देण्यात आला. या हत्याकांडामध्ये 'कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकर्त्यांमधील संस्थात्मक पक्षपातीपणा उघड' झाल्याचं उच्च न्यायालयाने आपल्या निवाड्यात म्हटलं होतं.

खाजगी अवकाशांमधील हिंसाचार, सार्वजनिक कायदा-सुव्यवस्थेला धक्का लागणं, दंगल व इतर वाद-अशा प्रत्येक वेळी कारवाई करण्यासाठी, मध्यस्थी करण्यासाठी, वाद मिटवून शांतता प्रस्थापित करण्यासाठी पोलीस दलाला वारंवार पाचारण केलं जातं, त्यामुळे हे राज्यसंस्थेचं सर्वांत दृश्यमान अंग असतं. या दलाच्या

पुरुष व स्त्री कर्मचाऱ्यांना रोज जनतेला व नागरिकांना सामोरं जावं लागतं. पोलीस अतिशय स्नेहशील आहेत व 'सेवे'साठी तत्पर आहेत, असं दाखवण्यासाठी वारंवार जनसंपर्काची अभियानं राबवली जातात. पण पोलिसांची सेवा घेणाऱ्या समुदायांचा व वसाहतींचा या दलाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे? भारतासारख्या बहुधार्मिक व बहुविधतापूर्ण समाजामध्ये या बहुविधतेची हाताळणी करण्यासाठी पोलीस कितपत सक्षम असतात? त्याहून महत्त्वाचं म्हणजे, आपण ज्या वातावरणात लहानाचे मोठे झालो तिथल्या पूर्वग्रहांची व पक्षपाती वृत्तीची हाताळणी कशी करावी, याचं प्रशिक्षण त्यांना दिलं जातं का?

पोलीस दलाच्या सुधारणेचा विषय अनेकदा चर्चेमध्ये चघळला जातो, पण राज्य सरकारं त्यावर क्वचितच परिणामकारक पावलं उचलतात. १९७८ची राष्ट्रीय पोलीस समिती, उत्तर प्रदेशच्या माजी पोलीस महासंचालकांनी १९९५मध्ये दाखल केलेली जनहित याचिका (ज्याची सुनावणी अजूनही सुरू आहे), १९९८ची ज्युलिओ रिबेरो समिती, आणि त्यापाठोपाठ पद्मनाभय्या, मलिमठ व सोली सोराबजी या समित्या– अशा अनेक स्त्रोतांमधून या संदर्भात सूचना व शिफारसी करण्यात आलेल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने २००६ साली यासंबंधी सहा आदेश दिले, त्यातील चौथ्या आदेशात असं म्हटलं आहे की, 'भारतासारख्या बहुविधतापूर्ण समाजामध्ये पोलिसांचं काम करण्यासाठी आवश्यक असलेली लोकशाही नियमांबाबतची संवेदना जागी राहावी' यासाठी पोलीस प्रशिक्षणामध्ये तरतूद असायला हवी. वंचित घटकांविरोधातील पोलिसी भेदभावाच्या असंख्य प्रकरणांमध्ये गुंतलेल्या पुरुष व महिला अधिकाऱ्यांना देण्यात आलेलं प्रशिक्षण निरुपयोगी ठरलं, हे तर स्पष्टच आहे.

महाराष्ट्रासह अनेक राज्यांनी आदर्श पोलीस अधिनियम मंजूर केला आहे, त्यातून काही सुधारणा झाल्या. पण या सुधारणा सुट्या-सुट्या पद्धतीने उपयोगी पडणार नाहीत. व्यापक समाजातील पूर्वग्रह व पक्षपातीपणा दूर करण्यासाठी बराच काळ जावा लागेल. अशा सामाजिक पूर्वग्रहांच्या प्रवाहाविरोधात जाण्यासाठी पोलिसांना अधिक प्रशिक्षण देण्याची गरज आहे. ●

## श्वासोच्छवासाची किंमत

*हवा प्रदूषण हा सार्वजनिक आरोग्यापुढील धोका आहे; त्यावर दीर्घकालीन परिणामकारक उपायांची गरज आहे.*

प्रदूषित हवेमुळे भारतीयांमधील मृत्यूचं प्रमाण अवाजवीरित्या जास्त आहे आणि त्यांना आजारांचाही जास्तीचा ताण सहन करावा लागतो, यावर 'लॅन्सेट प्लॅनेटरी हेल्थ' या नियकालिकात प्रकाशित झालेल्या एका संशोधनातील निष्कर्षांनी शिक्कामोर्तब केलं आहे. जागतिक पातळीवर हवा प्रदूषणाची सर्वाधिक पातळी असलेल्या देशांमध्ये भारताचा समावेश होतो. या प्रदूषणाचा धोका निवळावा यावर नव्याने लक्ष देण्याची गरज आहे, याकडे यातून लक्ष वेधलं गेलं आहे. हवा प्रदूषणामुळे लोकांच्या आरोग्याला जीवघेण्या संकटाला सामोरं जायला लागतं आहे, असा निराशाकारक निष्कर्ष या संशोधनात नोंदवला आहे. भारतातील हवा प्रदूषणामुळे आरोग्याला असलेले धोके आणि आयुर्मानावर होणारा त्याचा विपरित परिणाम, यांची व्याप्ती किती आहे याची पूर्ण दखल आतापर्यंत घेतली गेली नव्हती.

भारतातील विविध ठिकाणच्या संस्थांमध्ये वैज्ञानिकांच्या एका गटाने हा अभ्यास संयुक्तरित्या केला. भारतातील सर्व राज्यांमध्ये २०१७ साली हवा प्रदूषणाचा किती परिणाम झाला याचा अंदाज या

अभ्यासाद्वारे बांधण्यात आला आहे. वातावरणातील सूक्ष्मकणांद्वारे होणारं आणि घरांमधून होणारं हवा प्रदूषणही यामध्ये विचारात घेण्यात आलं. मृत्यू, आजारांचा ताण व आयुर्मर्यादा, अशा तीन सामाजिक-लोकसांख्यिकी निर्देशांकांनुसार (सोशिओ-डेमोग्राफिक इंडेक्स : एसडीआय) या प्रदूषणाची वर्गवारी करण्यात आली. भारतामध्ये, २०१७ साली, वातावरणातील सूक्ष्म कणांद्वारे- पीएम २.५- लोकसंख्येला सहन कराव्या लागणाऱ्या प्रदूषणाची वार्षिक भारित मध्य पातळी ८९.९$\mu g/m^3$ इतकी होती. जगातील सर्वाधिक प्रदूषणाच्या प्रमाणांपैकी हे एक आहे. वातावरणातील सूक्ष्म कणांच्या संदर्भातील हवेची गुणवत्ता १०$\mu g/m^3$ या मर्यादेखाली ठेवावी, ही जागतिक आरोग्य संघटनेची शिफारस अंमलात आणणं भारतातील एकाही राज्याला शक्य झालेलं नाही. शिवाय, देशातील ७७ टक्क्यांहून अधिक लोकसंख्येला ४०$\mu g/m$३ यांहून अधिक प्रदूषणाच्या पातळीला सामोरं जावं लागलं. राष्ट्रीय वातावरणीय हवा गुणवत्ता प्रमाणकांद्वारे शिफारस करण्यात आलेल्या पातळीपेक्षा हे प्रदूषण जास्त आहे.

तंबाखूसेवनापेक्षाही हवा प्रदूषणामुळे भारतातील आजारांचा तणाव वाढला, श्वसनसंसर्गात वाढ झाली, फुफ्फुसांचे व हृदयाचे आजार वाढले, हृदयविकाराचा झटका व मधुमेह यांचं प्रमाणही वाढलं. सदर अभ्यासातील अंदाजानुसार २०१७मध्ये झालेले सुमारे १२ लाख ४० हजार मृत्यू हवा प्रदूषणामुळे झाले असावेत. यांपैकी सुमारे ५१.४ टक्के व्यक्ती ७० वर्षांहून कमी वयाच्या होत्या. किमान पातळीपेक्षा कमी प्रमाणात हवा प्रदूषण मर्यादित राहिलं असतं, तर सरासरी आयुर्मर्यादा १.७ वर्षांनी वाढली असती. परंतु, वातावरणातील सूक्ष्म कणांद्वारे होणारं प्रदूषण व घरगुती हवा प्रदूषण, या संदर्भात प्रत्येक राज्यामधील प्रदूषणाची पातळी आणि त्याचा आनुषंगिक परिणाम याची आकडेवारी भिन्न राहिली. उत्तर प्रदेश, हरयाणा, दिल्ली, पंजाब व राजस्थान या राज्यांमध्ये सूक्ष्म कण प्रदूषणाचा अक्षमता-तडजोड-जीवन-वर्ष दर सर्वोच्च आहे; तर छत्तीसगढ, राजस्थान, मध्यप्रदेश व आसाम या राज्यांमध्ये घरगुती हवा प्रदूषणासंबंधीचा हा दर सर्वाधिक आहे. हवा प्रदूषण केवळ नागरी प्रदेशांपुरतं किंवा शहरांपुरतं मर्यादित नाही, तर ग्रामीण प्रदेशांनाही त्याचा तितकाच फटका बसतो. किंबहुना, घन इंधन जाळल्यामुळे ग्रामीण भारतीयांना अधिक विषम प्रमाणात हवा प्रदूषणाला सामोरं जावं लागतं.

उद्योग, वाहनांमधून होणारं उत्सर्जन, पीक अवशेषांची जाळणी आणि बांधकाम यांमुळे होणारं हवा प्रदूषण वाढत्या अर्थव्यवस्थेनुसार गेल्या काही वर्षांमध्ये वाढत गेलं आहे. वर्षानुवर्षे- विशेषतः हिवाळ्यात- विषारी धुरक्याची झळ सोसणाऱ्या नवी दिल्लीच्या दाखल्यामुळे सरकारला या समस्येची दखल घेऊन त्यासंबंधी कृती करणं भाग पडलं आहे. प्रदूषणामुळे मोजावी लागणारी आर्थिक किंमत प्रचंड आहे, याकडे दुर्लक्ष करणं परवडणारं नाही. हवा प्रदूषणामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्यविषयक धोक्यांमुळेही अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात किंमत मोजावी लागते. जागतिक बँक व वॉशिंग्टन विद्यापीठ यांनी २०१६ साली प्रकाशित केलेल्या एका अभ्यासानुसार, भारतामध्ये हवा प्रदूषणामुळे होणारा कल्याणकारी स्वरूपाचा तोटा २०१३ साली अंदाजे ५०५.१ अब्ज डॉलर (२०११च्या क्रयशक्ती समतोलातील बदल लक्षात घेऊन काढलेली रक्कम) इतका होता. हवा प्रदूषणामुळे २०१३ साली भारताला जागतिक पातळीवर सर्वाधिक श्रम उत्पादन (अंदाजे ५५.३९ अब्ज डॉलर) गमवावं लागलं होतं. एकत्रितरित्या कल्याणकारी स्वरूपाचा तोटा आणि श्रम उत्पादनातील ऱ्हास यांमुळे २०१३ साली भारताच्या सकल घरेलू उत्पन्नाचं ८.५ टक्क्यांहून अधिक नुकसान झालं. हवा प्रदूषण आर्थिक वाढीवर विपरित परिणाम करू शकतं.

हवा प्रदूषणाचे परिणाम कालानुक्रमे अधिकाधिक

गंभीर होत गेले, त्यानंतर अगदी अलीकडे केंद्र सरकारने या धोक्याची दखल घेतली. हवा प्रदूषण ही भारतव्यापी समस्या आहे, हे मान्य करत सरकारने राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमाचा मसुदा तयार केला. भारतभरातील हवाई गुणवत्तेवर देखरेख ठेवण्याची संस्थात्मक क्षमता उभारणं व बळकट करणं, हवा प्रदूषणाचे आरोग्यावरील परिणाम समजून घेण्यासाठी एतद्देशीय अभ्यास करवून घेणं आणि राष्ट्रीय उत्सर्जन शोधकेंद्र स्थापन करणं, अशी कामे या कार्यक्रमांतर्गत करण्याचं घाटलं होतं. परंतु, प्रदूषण कपातीबाबत स्पष्ट उद्दिष्ट नसणे आणि विशिष्ट कालमर्यादेत प्रमाण पातळी गाठण्यासाठीच्या व्यूहरचनांचा अभाव, यांमुळे पर्यावरणवाद्यांनी या कार्यक्रमावर टीका केली. डिसेंबर २०१८पर्यंत प्रमाणित पातळी गाठण्यासाठी कोळशावर आधारित औष्णिक ऊर्जा प्रकल्पांचं नियमन आवश्यक होतं, परंतु सरकारने अलीकडेच यासाठीचे निर्बंध शिथील केले आहेत, नवीन प्रकल्पांना या कायदेशीर पातळीचं पालन करण्यापासून मुभा दिली आहे आणि मोठ्या बांधकाम प्रकल्पांच्या पर्यावरणीय परिणाम मूल्यमापनालाही फाटा दिला आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरणवाद्यांची टीका मूलभूत महत्त्वाची ठरते. देशातील हवा प्रदूषणाची वाढती समस्या आटोक्यात आणण्याबाबत सरकारच्या प्रामाणिकपणावरच शंका उपस्थित करणाऱ्या या कृती आहेत. हवा प्रदूषण नियंत्रणात ठेवण्याचं आव्हान पेलायचं असेल तर प्रादेशिक हद्दी ओलांडून संयोजन गरजेचं आहे, शिवाय राजकीय व जनतेची इच्छाशक्तीही आवश्यक आहे आणि याला प्रत्यक्षातील कृतीची जोड अत्यावश्यक आहे.

●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (१५ व २२ डिसेंबर २०१८ या अंकांतून)

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक पुणे शहरात मिळण्याचे ठिकाण**

सनलाईट मीडिया डिस्ट्रीब्युशन

६३८, नारायण पेठ, पॉप्युलर हाऊस बिल्डिंग, दुकान क्र.३,
अप्पा बळवंत चौकाजवळ,
पुणे ४११०३०
भ्र. ९८५०६६२९८८

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक लातूरमध्ये मिळण्याचे ठिकाण**

अर्हन्त बुक डिस्ट्रिब्युशन

द्वारा विश्वदिप मेडिकल स्टोअर्स, एच. बी. टेकाळे,
तुळजाई हॉस्पिटलसमोर,
प्रकाशनगर, लातूर
भ्र. ९७६७८०११४०

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक जळगावमध्ये मिळण्याचे ठिकाण**

अथर्व पब्लिकेशन्स

तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, दत्त कॉलनी,
जळगाव-४२५००१
दू. ०२५७-२२३९६६६

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक पुणे शहरात मिळण्याचे ठिकाण**

माणगावकर एजन्सी

५३८ अ, शनिवार पेठ, किबे लक्ष्मी थिएटरसमोर,
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०
भ्र. ७०२००४४६५५